# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

## 2019-20

**क्रमांक: साप्रवि/एफजीआर/17 दिनांक 11.09.2019**

विषय : सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक 01 जानेवारी 2016 पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंबनिवृत्तिवेतनधारक यांना दयावयाच्या अनुषंगिक लाभाबाबत.

संदर्भ : 1) परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/04 दि.13.06.2013.

2) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : निवेसु-2018/प्र.क्र.130/सेवा4,दि.01.01.2019

3) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग क्रमांक : निवेसु-2018/प्र.क्र.130/सेवा- 4, दि.04.01.2019

4) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-2019/प्र.क्र.58/सेवा-4, दि.24.01.2019

5) विधी समिती ठराव क्र.57 दि.29.07.2019

6) स्थायी समिती ठराव क्र.555 दि.02.08.2019

7) महानगरपालिका ठराव क्र.771 दि.29.08.2019

केंद्र शासनाच्या सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारे महाराष्ट्र राज्य शासनाने संदर्भाधीन विविध शासन निर्णयान्वये निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनामध्ये/ कुटुंब निवृत्तिवेतनामध्ये सुधारणा करून त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 मधील निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन / सेवा उपदान / मृत्यु उपदान नियमित करणारे नियम आणि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, 1984 यांमध्ये सुधारणा केल्या आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे निवृत्तिवेतन विषयक नियम सर्वसाधारणपणे राज्य शासनाच्या धर्तीवर आधारित असतात. त्यामुळे या शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन सुधारित करून बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास विधी समिती/ स्थायी समिती / महानगरपालिकेची मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतन खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

2. (अ) **"विद्यमान निवृत्तिवेतनधारक "** म्हणजे दि. 31 डिसेंबर 2015 पर्यंत सेवानिवृत्त झालेला व दि.01 जानेवारी 2016 रोजी निवृत्तिवेतन घेत असलेला / घेण्यास पात्र असलेला निवृत्तिवेतनधारक.

(ब) **"विद्यमान कुटुंब निवृत्तिवेतनधारक "** म्हणजे दि.01 जानेवारी 2016 रोजी कुटुंब निवृत्तिवेतन घेत असलेला / घेण्यास पात्र असलेला कुटुंब निवृत्तिवेतनधारक.

(क) **"विद्यमान मुळ निवृत्तिवेतन"** म्हणजे दि.31 डिसेंबर, 2015 रोजी देय असलेले व त्यात निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग असल्यास तो धरुन मूळ निवृत्तिवेतन यामध्ये महानगरपालिका

J - 38715 (1-4)

कर्मचा-याला लागू असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 नियमातील निवृत्तिवेतनाच्या सर्व प्रकारांचा (जखम/ इजा निवृत्तिवेतन वगळून) समावेश होतो.

(ड) "महागाई वाढ" म्हणजे निवृत्तिवेतन धारकांना सातव्या वेतन आयोगात दि.01.01.2016 पासून देय असलेली महागाई वाढ होय.

निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनावर दिनांक 01 जानेवारी 2016 पासून पुढे दर्शविलेल्या दराने महागाई वाढ देण्यात यावी.

| अनु.क्र. | कालावधी | महागाई वाढीचा दर |
|---|---|---|
| 1 | दिनांक 01 जानेवारी 2016 ते दिनांक 30 जुन 2016 पर्यंत | 0 % |
| 2 | दिनांक 01 जुलै 2016 ते दिनांक 31 डिसेंबर 2016 पर्यंत | 2 % |
| 3 | दिनांक 01 जानेवारी 2017 ते दिनांक 30 जुन 2017 पर्यंत | 4 % |
| 4 | दिनांक 01 जुलै 2017 ते दिनांक 31 डिसेंबर 2017 पर्यंत | 5 % |
| 5 | दिनांक 01 जानेवारी 2018 ते दिनांक 30 जुन 2018 पर्यंत | 7 % |
| 6 | दिनांक 01 जुलै 2018 पासून पुढे | 9 % |

3. सातव्या केंद्रीय वेतन आयोगाने दि.01.01.2016 पुर्वीच्या निवृत्तिवेतनधारकांच्या संदर्भात केलेल्या शिफारशीप्रमाणे, राज्यातील निवृत्तिवेतन धारकांच्या विद्यमान मूळ निवृत्तिवेतनास (यामध्ये महागाई वाढीचा समावेश नसेल) 2.57 ने गुणून अनुज्ञेय होणारे सुधारित निवृत्तिवेतन देण्याचा निर्णय संदर्भाधिन शासन निर्णय व शासन शुध्दीपत्रकान्वये घेण्यात आला आहे.

त्या धर्तीवर मुंबई महानगरपालिकेतील दि.01.01.2016 पुर्वीचे निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतन धारकांच्या विद्यमान मूळ निवृत्तिवेतनास (यामध्ये महागाई वाढीचा समावेश नसेल) 2.57 ने गुणून येणारी रक्कम याप्रमाणे निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन सुधारित करण्यात यईल. सदर रक्कम अपुर्णांकात येत असल्यास त्यास पुढील रुपयामध्ये पुर्णांकित करण्यात येईल. सुधारित निवृत्तिवेतन निश्चितीकरणाची सोपी परिगणना लक्षात घेता याकरिता शिघ्रगणकाची आवश्यकता वाटत नाही. तथापि, असे करताना एखादया निवृत्तिवेतनधारकांचे / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन रु.7500/- पेक्षा कमी निश्चित होत असल्यास ते किमान रु.7500/- इतके निश्चित करण्यात यावे.

4. विद्यमान निवृत्तिवेतनधारक / विद्यमान कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना एकत्रित दराने निवृत्तिवेतनाचे प्रदान करण्यासाठी प्रमुख लेखापाल (कोषागार) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

5. ज्या प्रकरणी निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक दिनांक 01 जानेवारी 2016 रोजी हयात असेल व त्यानंतर मृत्यु पावलेला असेल अशा प्रकरणी त्याचे कायदेशीर वारसदार, दि.01 जानेवारी 2016 पासून निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूच्या दिनांकापर्यंतची हयातकालीन थकबाकी मिळण्यास पात्र ठरेल/ ठरतील. यासाठी कायदेशीर वारसदारांनी महानगरपालिका

J-38715

कर्मचारी जेथून सेवानिवृत्त झाला असेल किंवा त्याच्या मृत्युपूर्वी तो जेथे कार्यरत असेल त्या विभाग प्रमुखाकडे / खातेप्रमुखाकडे अर्ज करावा. हयातकालीन थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास त्यातून प्रलंबित वसुलीच्या रकमा असल्यास त्या समायोजित करुन एकाच हफ्त्यात त्यांच्या कायदेशीर वारसास रोखीने (प्रचलित पद्धत अनुसरून) अदा करण्यात यावी. त्याचप्रमाणे थकबाकीचे एक किंवा अधिक हप्ते रोखीने (प्रचलित पद्धत अनुसरून) अदा केल्यानंतर मृत्यु पावलेल्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या बाबतीत उर्वरीत थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास त्यातून प्रलंबित वसुलीच्या रकमा समायोजित करुन एकाच हफ्त्यात कायदेशीर वारसास रोखीने (प्रचलित पद्धत अनुसरून) अदा करण्यात यावी.

6. निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात दि.01.01.2016 पासून सुधारणा करण्यात यावी. मात्र सुधारित वेतन संरचनेत निवृत्तिवेतनांचा प्रत्यक्ष लाभ दि.01.01.2019 पासून अदा करण्यात यावा. दि.01.01.2016 ते दि.31.12.2018 हया कालावधीतील देय होणा-या थकबाकीची रक्कम पुढील 2 वर्षात 2 समान हफ्त्यात अदा करण्यात यावी. सन 2019 मध्ये अदा करावयाचा पहिला हप्ता जून 2019/ मंजुरीच्या नजीकच्या मासिक निवृत्तिवेतनासोबत अदा करावा. उर्वरीत हप्ता पुढील वर्षी माहे जूनच्या मासिक निवृत्तिवेतनासोबत अदा करावा. वसुलीच्या रकमा असल्यास थकबाकीतून समयोजित करून नियमानुसार आयकर कपातीची कार्यवाही करावी.

सर्व खाते प्रमुख, सहाय्यक आयुक्त, अधिष्ठता , रुग्णालय प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील आस्थापना कर्मचा-यांना वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दयावेत.

सदर परिपत्रकाची प्रत महानगरपालिकेच्या Intranet वर ftp://45.249.109.226/Circulars/ GAD/ Dy.CA. Estt- II या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/-दि.30.08.2019 | सही/-दि.31.08.2019 | सही/-दि.31.08.2019 |
| श्री.अशोक दा.रुपवते | श्रीम.सुलोचना कवडे | श्री.प्रदिप पडवळ |
| उप प्रमुख लेखापाल (आस्था-2) | प्रमुख लेखापाल (कोषागार) | प्रमुख लेखापाल (वित्त)प्र. |

| | | |
|---|---|---|
| सही/-दि.03.09.2019 | सही/-दि.03.09.2019 | सही/-दि. 04.09.2019 |
| श्री.मिलिन सावंत | श्री.ए.एल.ज-हाड | श्री. प्रविण दराडे |
| सह आयुक्त (सा.प्र.) | अति.आयुक्त (शहर) | अति.आयुक्त (प्रकल्प) |

सही/-दि.09.09.2019
श्री.प्रवीण परदेशी
मा.महानगरपालिका आयुक्त

J-38715

(4)

परिपत्रक

2019-20

क्रमांकः साप्रवि/एफजीआर/17 दिनांक 11.09.2019

प्रत ---------------------------------------- यांना ( ----- ज्यादा प्रतींसह) माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना.

11/9/2019

उप प्रमुख लेखापाल (आस्था.2) करिता

NS 2437-CA - BMPP - 38715 - 2019-20 - 100 Copy